ISSN 2319-9318

UGC Sponsored

# International Multilingual Research Journal

# Printing Area

Special Issue March 2019


## ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE

on

# MAHATMA @ 150

on

2nd March 2019



**Organized by**

**Gandhi Study Centre**

New Arts, Commerce & Science College,

Wardha, Maharashtra (India) - 442 001

PRINCIPAL

Dr. M. K. Umathe College

Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

29) ग्रामीण विकासात महात्मा गांधीचे विचार आणि सद्यस्थिती — 85
प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख नरखेड

=============000=============

30) गांधी विचाराची वर्तमानातील सार्थकता मूलभूतता — 88
पूनम तडस, संशोधक

=============000=============

31) महात्मा गांधींचे सर्वोदयासाठी पनुर्निर्माण कार्य — 90
प्रा. रुपेश रा. कुचेवार, सहाय्यक प्राध्यापक, वर्धा

=============000=============

32) महात्मा गांधीजीची विचारसरणी आणि सर्वोदय चळवळ — 93
प्रा. सिध्दार्थ बी. टेंभूर्णे, उमरेड जि. नागपूर

=============000=============

33) स्वदेशी व सत्याग्रह गांधीजीची विचार प्रणिती — 96
स्नेहा ब. सातघरे, संशोधक

=============000=============

34) राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या सामाजिक विचाराची प्रासंगिकता — 98
प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे, राज्यशास्त्र विभागप्रमुख शेंदुरजनाघाट

=============000=============

35) महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्या विषयी दृष्टीकोण एक अभ्यास — 101
प्रा. सुनिल शंकरराव गोईनवाड, सहाय्यक प्राध्यापक, नांदेड

=============000=============

36) महात्मा गांधी : शिक्षण विषयक विचारांची प्रासंगिकता — 104
सुषमा वि. आदमने, शोधकर्ती

=============000=============

37) 'महात्मा गांधीचे रचनात्मक कार्यक्रम' — 107
प्रा. विनोद बी. खेडकर, सहाय्यक प्राध्यापक, भामटी, रिंग रोड, नागपूर

=============000=============

38) महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्यातून स्वालंबन व स्वराज्य — 110
योगिता झिलपे, शोधार्थी

=============000=============

39) महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगाचे विश्लेषणात्म अध्ययन — 114
डॉ. अफरोज हनिफ शेख, कार्यकारी प्रांचार्य, नागपूर

=============000=============

40) महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनातील ग्रामीण अर्थव्यवस्था — 116
प्रा. डॉ. बळीराम प. अवचार, सहाय्यक प्राध्यापक, खडकी अकोला

=============000=============

41)गांधीजी आणि खादी — 119
Dr. Nitin V. Changole, HOD. Dept. of History, Amravati

=============000=============

42) महात्मा गांधी आणि त्यांच्या शैक्षणिक विचारांची विशिश्टता आणि प्रासंगिकता — 122
कैलाश वि. विसांद्रे (सहाय्यक प्राध्यापक) वर्धा

=============000=============

43) सत्याग्रह—लोकशाहीला पुरकं — 127
प्रा. लक्ष्मण शा. पवार, वरुड

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

निष्कर्ष:

1. युवा पिढी नैतिक, परोपकार, द्या, क्षमा, प्रेम, सहकार्य वृत्ती, वडील धाऱ्याचा आदर, स्वावलंबी मूल्य रुजविल्या जावू शकतो.
2. गुणवत्तापूर्ण उत्तम बुनियादी शिक्षण पद्धतीचे चारित्र निर्माण होऊ शकते.
3. मुल्याधोग विध्यार्थाचा सर्वागीण विकास होतो.
4. मूल्याधारित शिक्षणातून व्यक्तीमध्ये समाजसेवेची प्रेरणा निर्माण होते.

संदर्भ सूची:


1. hindusthani Talim Sangh,(1956), eEducation reconstruction, Sewagram Wardha
2. Pruthi R.K chaturvedi archana, 1st edition 2009, Gandhian education
3. कुमार ललीत, नई तालीम आणि आधुनिक शिक्षा
४. गांधी मोहनदास, मेरे सपनो का भारत.



सुषमा वि. आदमने

समाजकार्य विभाग

न्यू आर्ट्स कॉमर्स व सायन्स कॉलेज, वर्धा.


**37**

## 'महात्मा गांधीचे रचनात्मक कार्यक्रम'


**प्रा. विनोद बी. खेडकर**

सहाय्यक प्राध्यापक,

समाजशास्त्र विभाग

डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,

भामटी, रिंग रोड, नागपूर २२.

मो. : ९४२१५३७१२३

Email :- khedkarvinod09@gmail.com


000

आधुनिक भारताचे जनक म्हणून महात्मा गांधीना ओळखले जाते. भारतीय समाजव्यवस्था एकसंघ ठेवून भारताचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विकास साधण्यासाठी २१ व्या शतकातही महात्मा गांधीचे विचार महत्वाचे ठरतात. गांधीनी जो मार्ग दाखविला आणि जे साध्य केले, ते विस्मरण होणार नाही. कारण तो त्यांच्या कार्यप्रणालीचा महत्वाचा भाग होता. गांधीनी युद्ध, हिंसा आणि घृणा निर्माण झालेल्या विश्वाला सत्य, प्रेम आणि अहिंसेचा मार्ग दाखविला. कोणतीही समस्या शांततापूर्ण मार्गाने मिटवता येतात. त्यासाठी सत्याग्रह, असहकार आणि बहिष्कार इत्यादी नैतिक मार्ग सांगितले आहेत.

महात्मा गांधीनी स्वदेशी, स्वराज्या बरोबरच अस्पृश्यता निवारण, ग्रामीण उत्थान, सांप्रदायिक सद्भावना टिकवून ठेवण्यासाठी देखिल महत्वाचे योगदान दिले आहे. गाधीजी म्हणत "मी अशा भारतासाठी काम करणार ज्यामध्ये गरीबांतील गरीब व्यक्ती विचार करेल की, भारत माझा देश आहे. ज्याच्या नव निर्मितीमध्ये त्यांचा देखिल वाटा आहे. एक असा भारत की ज्यामध्ये उच्च व निम्न जातींचे लोक नसलीत. ज्यामध्ये सर्व संप्रदायातील लोक सामंजस्याने राहतील. यामध्ये कसल्याही प्रकारची स्त्री—पुरूष भेद, अस्पृश्यता नसेल. हाच माझ्या स्वप्नातील भारत आहे"[१] आज संपूर्ण विश्वामध्ये सामाजिक, आर्थिक स्तरावर भारत मोठ्या प्रमाणावर प्रगती पथावर आहे. त्याचे सर्वात मोठे योगदान महत्मा गांधीना द्यावे लागते. गांधीनी सांगितलेल्या

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

व केलेल्या कार्यावरच आज देश प्रगती करीत आहे. म्हणून महात्मा गांधीच्या वैचारिकतेचा व समाज बांधणीतील विचारांचा आढावा घेणे गरजेचे वाटले. २१ व्या शतकात जेथे संपूर्ण विश्वामध्ये विविध स्पर्धा निर्माण होवून अनेक प्रश्न (समस्या) निर्माण होत आंहेत. म्हणून आजही गांधीच्या विचारांची आवश्यकता भासते. त्याच उद्देशाने संशोधकाने "महात्मा गांधीजीचे रचनात्क कार्यक्रम" हा विषय शोध निबंधासाठी निवडला आहे.

### पद्धतीशास्त्र :

कोणतेही संशोधन करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो. शास्त्रीय संशोधनातून रचनात्मक गोष्टी समोर येत असतात. त्यासाठी काही सामाजिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

### संशोधनाचे उद्दीष्ट्ये :

१) महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्यामध्ये आर्थिक विचारांचा आढावा घेणे.

२) महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्याचा आढावा घेणे.

### तथ्य संकल्नाचे पद्धती :

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम पद्धतीचा उपयोग केला आहे. यामध्ये मासिके, संदर्भ ग्रंथ, लेख, वर्तमानपत्रे, इंटनेट इत्यादींचा उपयोग केला आहे.

### संशोधन आराखडा :

प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधन आराखडा म्हणून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचे उपयोग केला आहे.

### महात्मा गांधीचे आर्थिक विचार :—

गांधीचे आर्थिक विचार सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादाशी सुसंगत असेच आहेत. गांधीनी भारतातील राजकारणात पदार्पण केल्यानंतर येथील खेड्यांशी त्यांचा जवळुन संबंध आला. खेड्यातील नव्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेला पायाभूत बनवू शकेल अशी आशा त्यांनी मनाशी बाळगली. आणि त्या दृष्टीने आपल्या विधायक कार्यक्रमासाठी त्यांनी आखणी केली. गांधीच्या मते, आत्यंतिक दारिद्र्य माणसाला लाचार, भित्रा, नेभळट बनविते. म्हणून जगण्यासाठी प्रत्येकाला समतोल आहार, पुरेसा कपडालत्ता, राहण्यासाठी घर, शिक्षण आणि आवश्यक ती वैद्यकीय मदत मिळालीच पाहिजे. गांधीचे मत होते की, 'गरजा कमी करा', आर्थिक विकासाच्या या संकल्पनेत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व वैद्यकीय मदत या प्राथमिक गरजांना महत्व दिलेले दिसून येते.

महात्मा गांधी म्हणत विणकर, शेतकरी व शिक्षकांच्या मुलात कधी भेद नसावा. सर्व समान आहेत. राजा–प्रजा, मालक–मजूर, गरीब–श्रीमंत या सर्वाचा स्तर एकच असला पाहिजे. त्यांच्या विचारात श्रमिक, मजुर, धनिक व उद्योगपती हे दोन्ही समान आहेत. गांधीनी खादी उद्योगाचा पुरस्कार केला कारण खादीच्या प्रसाराने प्रतिष्ठा मिळाल्याने लोकांना काम मिळेल, लोकांना पैसा मिळेल, बेकारीचा प्रश्न दुर होईल, त्यांच्या गरजा भागविल्या जातील. कमी भांडवल, योग्य गुंतवणूक, रोजगार निर्मिती यामुळे होईल असे गांधीजींना वाटत होते. गांधीच्या मते, ग्रामउद्योग ग्रामोद्योगाशिवाय पर्याय नाही त्याप्रमाणे त्यांनी स्वदेशीचा आग्रह धरला. खादी, तेल उद्योग, सुतारकाम, चांभारकाम असे गृह उद्योग चालविणे ज्यामुळे बेकारी दूर होऊन रोजगार प्राप्त होईल.

### गांधीचे रचनात्मक कार्यक्रम :

महात्मा गांधी यांनी भारतातील प्रत्येक घटकांवर विचार व्यक्त केले आहेत. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती असे प्रत्येक क्षेत्र गांधी विचाराने व्यापला आहे. यावरोबर राष्ट्र विकासासाठी निश्चित असा कार्यक्रम महात्मा गांधी यांनी दिला आहे.

### ग्रामीण विकास :

'ग्रामीण विकासाचा किंवा खेड्यांचा पुर्नरूद्धार केवळ तेव्हा संभवनिय असेल जेव्हा त्याचे शोषण होणार नसेल.'[३] गांधीचे हे विचार भारतीय खेड्यांचे महत्व स्पष्ट करते. राष्ट्र विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्वांगीण प्रगती अभिप्रेत असते. ग्रामीण समाज विकसीत असेल तर राष्ट्र विकासाची प्रक्रिया देखिल भक्कम असते म्हणून महात्मा गांधीनी खेड्यांच्या विकासाला महत्व दिले.

गांधीच्या मते खेडी स्वयंपूर्ण व स्वयंशासित असणे आवश्यक आहे. ज्या गावात राज्यसत्ता व समाजसत्ता एकत्रित येईल तेथेच ग्रामराज्य येईल. महात्मा गांधीनी १९४१ मध्ये 'रचनात्मक कार्यक्रम' या पुस्तकामध्ये ग्रामविकासाचा १८ कलमी कार्यक्रम सांगितला. ग्रामधुन रामराज्य अस्तित्वात येईल. महात्मा गांधीने उपलब्ध पाण्याचे योग्य रितीने व्यवस्थापन व नियोजन करून लोकांना पिण्यासाठी, वापरण्यासाठी व शेतीसाठी स्वच्छ व निर्मळ पाणी पुरेशा प्रमाणात मिळायला पाहिजे अशा विकेंद्रित व्यवस्थेतच लोकशाही तयार होवून टिकवून राहिल.[४] हे विचार ग्रामीण विकास अधोरेखीत करते. ग्रामीण विकासाच्या संदर्भात महात्मा गांधी म्हणतात, "ग्रामस्वराज्य हे आज आपल्या देशाची मोठी आवश्यकता आहे. जोपर्यंत गांव स्वावलंबी व स्वतंत्र होणार नाही तो पर्यंत राष्ट्राच्या स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही"[५] यातुन त्यांचे ग्रामीण विकासाची धडपड दिसून येते. त्याचबरोबर ग्रामीण विकास जर साधायचा असेल तर गांवातील गरजा गावातच पूर्ण केल्या जाव्यात. त्यासाठी बलुतेदारी, कारागीरी, उद्योग, हस्तकला, कुटीर उद्योग इत्यादींना प्रोत्साहन दिले जावे. यातूनच राष्ट्र उभारणी होते.

**खादी :**

महात्मा गांधी यांच्या रचनात्मक कार्यक्रमामध्ये खादीला महत्वाचे स्थान दिले आहे. 'माझा एकच संदेश आहे तो म्हणजे खादी. तुम्ही माझ्या हातामध्ये खादी द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो.'[६] असे महात्मा गांधी म्हणत. गांधीनी खादी प्रसारासाठी आग्रह धरला. यामुळे श्रम, प्रतिष्ठा मिळुन लोकांना काम मिळेल, पैसे मिळतील, गरजा भागतील व बेकारीचा प्रश्न मिटेल यासाठी खादी वापर आवश्यक आहे. कमी भांडवलीमध्ये अधिक कमाई हे सुत्र गांधीनी खादी उत्पादनामागे लावले होते.

**अस्पृश्यता निवारण :**

अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील रोग आहे व तो दुर झाला पाहिजे असे गांधीजी म्हणत. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस स्पर्श करणे म्हणजे अमानुषपणाचाच कळस आहे. यातुनच त्यांनी 'हरिजन' या शब्दाचा उपयोग केला. महात्मा गांधी म्हणतात की, मी अस्पृश्यता या पापालाच हातामध्ये घेतले आहे. मी हिंदु पावित्र्यावरती आक्रमण करीत आहे. कारण हिंदु जातीचे असे मत आहे की, मानवी जीवनातील एका वर्गास स्पर्श करणे 'पाप' आहे. कारण तो एका विशिष्ट जातीमध्ये जन्मला आहे. म्हणून मी एक हिंदु म्हणून हेच सिद्ध करून दाखवत आहे की, या लोकांना स्पर्श करणे पाप नाही. यावरून महात्मा गांधीजीची अस्पृश्य निवारणासाठीची तळमळ दिसून येते. पुढे त्यांनी 'हरिजन सेवक संघ' स्थापन करून सार्वजनिक शाळा, मंदिरे, पाणवठे अस्पृश्यांसाठी खुले करणे असे विविध कार्यक्रम हाती घेतले.

**नई तालीम :**

महात्मा गांधीनी 'नई तालिम' शिक्षण पद्धतीला सुरूवात केली. यामध्ये शिक्षण आणि उद्योग या दोन्ही घटकांचा समन्वय साधायचा प्रयत्न केला. गांधीच्या मते शिक्षण हे साध्य व साधन आहे. त्यातुन वर्गविहीत व शोषणहीत समाज निर्माण होईल. या शिक्षणामधून गरीबी, बेकारी, व्यसनाधिनता, अज्ञान इत्यादी समस्यांचे निमुर्लन होईल. स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, ज्ञानार्जन, उद्योग इत्यादी. साध्य होईल म्हणून महात्मा गांधी 'नई तालिमला' महत्व देतात.

**गांधीजींची विश्वस्त संकल्पना :**

महात्मा गांधीनी आदर्श राज्याची आवश्यकता वाटत होती. त्यांच्या आदर्श राज्यामध्ये बेकारीचे निमुर्लन, स्वातंत्र्य, समता व न्याय इत्यादी गोष्टी अभिप्रेत होत्या. याच दृष्टिकोनातून त्यांनी 'विश्वस्त' ही संकल्पना मांडली. साध्या सरळ व सोप्या शब्दांमध्ये गांधीनी विश्वस्त योजना मांडली त्यासाठी त्यांनी त्याचे स्वरूप देखिल मांडले. गांधीजी म्हणतात की, 'तुम्ही करोडा रूपये मिळवा, पण बाकीचे सारे समाजासाठी वापरा.' त्यांच्या मते, संस्थानिकांनी समाजाच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून काम करावे. संपत्तींच्या उत्पन्नाचा वाटा समाजाच्या कल्याणासाठी करावा. गांधीजींच्या मते, जी काही संपत्ती आहे ती ईश्वरासाठी आहे. ही त्यांच्या कृपेने मिळाली आहे. ही त्याची संपत्ती नसून जगाला सेवेसाठी त्याचाकडे सोपविली आहे.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

## स्त्री सुधारणा :

महात्मा गांधी स्त्री–पुरूष समानतेचे पुरस्कर्ते होते. स्त्रीयांना व्यावहारीक शिक्षण दिले पाहिजे, त्यांना स्वतंत्र रितीने विचार करता यावा असे त्यांचे मत होते. त्याचबरोबर विधवा विवाहाचा पुरस्कार केला. वेश्यावृत्तीतील स्त्रीया जबाबदार नसून पुरूषच जबाबदार आहे असे गांधीजी म्हणत. त्याच्यामध्ये स्वाभीमान निर्माण करणे व स्वावलंबी बनविण्याचे कार्य महात्मा गांधीनी हाती घेतले होते. या व्यतिरिक्त गांधीजींनी शिक्षण, आरोग्य, बालसुधारणा, दारूबंदी, प्रौढ शिक्षण, ग्रामसफाई, अहिंसा, भाषा विकास, कामगार, विद्यार्थी इत्यादी विषयी रचनात्मक कार्यक्रम हाती घेतले होते.

## संदर्भ ग्रंथ :–

१) हरदान हर्ष. २००६. गाँधी विचार और दृष्टि, श्याम प्रकाशन, जयपूर. पृ.क्र. ४.
२) पंडित नलिनी. २००६. गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पृ.क्र. २४३.
३) डॉ. कुकडेकर नरसिंग. २०१३. महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम आणि पोलिस प्रशासन, अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध स्वा.रा.ती.म. वि. नांदेड. पृ.क्र. ३.
४) मोरे संग्राम. २०१०. ग्रामिण विकासाचे राजकारण आणि काँग्रेस, अरूणा प्रकाशन, लातुर. पृ.क्र. ७२.
५) भारदे बाळासाहेब. २००३. ग्रामक्रांतीची दिशा, म. गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे. पृ.क्र. ४.
६) सुजाता. २०१२. गाँधी की नैतिकता, सर्व सेवा संघ– प्रकाशन, वाराणसी. पृ.क्र. १६०.

## संदर्भ ग्रंथ सूची :–

१) ताटके अरविंद. १९९४. महात्मा गांधी, सरिता प्रकाशन, पुणे.
२) विवके रामलाल. २००४. महात्मा गाँधी जीवन और दर्शन, पंचशिल प्रकाशन, जयपूर.
३) M.K. Gandhi. 1948. Constructive Programme Its Meaning and Place, Navbhavan.
४) महात्मा गांधी.. २०१०. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

# महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्यात स्वालंबन व स्वराज्य

योगिता झिलपे
शोधार्थी

**सारांश:**

सर्वात प्रसिद्ध व्यक्ती म्हणून गांधीजीला मान्यता गेले. गांधी विच्याराची मूलभूतता आणि भौतिक वर्तमानातही तेवढीच आहे. गांधीच्या विच्यारात आचारात फरक नव्हता म्हणूनच आत्मकथेचे शीर्षक "माझे जीवन माझा संदे असे म्हटले. गांधीच्या बाबत जगातील मह वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन म्हणत नव्यापिढ्या विश्वास करणार नांही की या जग एक हाडा मासाचा माणूस या पृथ्वी तलाव चालला होता. तो म्हणजे गांधी यावरून गांधी थोरवी कळते. गांधीनी जे पायाभूत विचार म व त्यास जी रचनात्मक कार्याची जोड त्यातून स्वालंबन आणि स्वराज्याची व्यव निर्माण करणे. शक्य झाले. गांधीच्या रचना कार्यातून स्वालंबन व स्वराज्याच्या विविध अध्ययन व्हावे म्हणून गांधी साहित्याच्या अ समीक्षण करण्यात आले.

**प्रस्तावना:**

भारत हा कृषी-उद्योग प्रधान देश असून व्यवस्था प्रमुख आहे. समाज हा त्यांच्या अ व समृद्धीवरून ओळखल्या जाते. ऐकून 70 म्हणजे (साडे सात लाख खेड्यात) वसलेला ग्रामीण अर्थव्यवस्थेचा 70-80 भाग हा श व्यापलेला आहे. ग्रामीण क्षेत्राचा झाल्याशिवाय खरे स्वालंबन किंवा आत्मनि येवू शकत नाही असे गांधीजींना वाट स्वलंबना शिवाय स्वराज्याची कल्पना संभ म्हणून गांधीनी रचनात्मक कार्याचा पाया ज्या व्दारे उत्पादन निर्मिती बरोबरच रोज आणि समृद्धीची बीज पेरता येवू शकत करीता गांधीनी संघर्षात्मक कार्या सोब तऱ्हेच्या रचनात्मक कार्य सांगितली उदा ग्रामोद्योग, नई तालीम, प्रौढ शिक्षण, वैगरे.

गांधीच्या रचनात्मक कार्याची सुरूवात 'एका वेळेला एक पाऊल' या पध्दतीने दि

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022